# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१८

# इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण : 40**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. **१ ते ५** प्रश्न इतिहास व **६ ते ९** प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत लिहा (कोणतेही तीन).** [3]

१. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे आंतरराष्ट्रीय न्यायालय हॉलंडमधील __________ या शहरात आहे.
(न्यूयॉर्क, अंकारा, हेग)

२. धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व __________ यांनी केले. (सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, मादाम कामा)

३. __________ च्या तहानुसार हाँगकाँग बेट इंग्रजांना मिळाले. (पेकिंग, नानकिंग, कानागावा)

**ब. ‘अ’ स्तंभातील घटकांशी ‘ब’स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा.** [3]

| | **‘अ’ स्तंभ** | | **‘ब’ स्तंभ** |
|---|---|---|---|
| १. | मंगोपार्क | अ. | भारतीय परमसंगणकाचे निर्माते |
| २. | डॉ. विजय भटकर | ब. | अमेरिकन राष्ट्राध्यक्ष – १४ कलमे घोषित |
| ३. | वुड्रो विल्सन | क. | युरोपातील धाडसी प्रवाशी |
| | | ड. | कम्युनिस्ट मॅनिफेस्टो |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन).** [4]

१. आक्रमक राष्ट्रवाद म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२. युरोपियनांच्या सहवासामुळे आशिया खंडातील लोकांना कोणत्या विचारसरणीची जाणीव झाली?

३. आर्थिक साम्राज्यवाद म्हणजे काय?

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन).** [4]

१. पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील अनेक राष्ट्रांमधील लोकशाही राष्ट्रे कोलमडू लागली.

२. आफ्रिका खंडात निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया उशिरा सुरू झाली.

३. चीनचे विभाजन झाले नाही.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दांत लिहा (कोणतेही दोन).** **[6]**

१. साम्राज्यवादाचे कोणतेही तीन अनिष्ट परिणाम लिहा.

२. 'रक्तरंजित रविवार' बद्दलची माहिती लिहा.

३. जागतिकीकरणाचे तोटे लिहा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** **[8]**

१. रशियन राज्यक्रांतीचे महत्त्व स्पष्ट करा.

२. खालील मुद्द्यांच्या आधारे दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम लिहा.

   १. प्रचंड जीवित व वित्त हानी

   २. आर्थिक परिणाम

   ३. साम्राज्यवादाच्या ऱ्हासास सुरुवात

   ४. संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना

३. शीतयुद्धाची कारणे थोडक्यात लिहा.

**प्र.६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[3]**

१. भारतात ________ प्रकारची लोकशाही आहे. (प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, अध्यक्षीय, मिश्र)

२. भाषेच्या बाबतीत ________ हा देश एकसंध आहे. (भारत, स्वित्झर्लंड, चीन, श्रीलंका)

३. ________ हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा असतो. (लोक, प्रतिनिधी, पंतप्रधान, लोकसहभाग)

**प्र.७. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन).** **[3]**

१. प्रत्यावाहन म्हणजे काय?

२. राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष म्हणजे काय?

३. संघराज्य पद्धत म्हणजे काय?

४. प्रादेशिक विषमता म्हणजे काय?

५. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील फरक सांगा.

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन).** **[4]**

१. भारतात कायद्याचा प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी कायदेमंडळाकडे आहे.

२. समान राजकीय भूमिका असलेले लोक राजकीय पक्ष स्थापन करतात.

३. जनतेचा पुढाकार लोकशाही कमकुवत बनवतो.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा** **[2]**

१. लोकशाहीपुढील प्रश्नांचे दुहेरी स्वरूप स्पष्ट करा.

२. विविध धर्मांचे लोक शांततेने व सलोख्याने राहावेत म्हणून काय उपाय केले जातात?